# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### आजरा तालुक्यातील (जि. कोल्हापूर) चित्री धरणाची उंची वाढविण्याबाबत

**(१) ३७७४ (२३-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा तालुक्यातील (जि. कोल्हापूर) चित्री धरणाची उंची वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) याबाबत या विभागातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ वा त्यासुमारास तत्कालीन मा. मंत्री, जलसंपदा यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) कृष्णा पाणी तंटा लवादानुसार राज्यास घटप्रभा उपखो-यात उपलब्ध झालेल्या पाण्याचे नियोजन पूर्ण झाले असल्याने चित्री धरणामध्ये वाढीव पाणीसाठा करण्यासाठी उंची वाढ करणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे नेसरी (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) येथील नळपाणी पुरवठा योजना तातडीने पूर्ण करणेबाबत

**(२) ३७७५ (१५-०१-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेसरी (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या गावासाठी सन २००६ साली नळपाणी पुरवठा योजनेस मंजूरी व निधी मिळूनही सदर योजनेचे काम अदयापही सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे काम सुरु न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर योजनेचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत संबंधीत विभागाने नविन प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अदयाप मंजूरी न देण्याचे कारणे काय ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०३-२०१५)** :(१) हे खरे नाही. सदर योजनेचे २६ टक्के काम पुर्ण झाले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही. परंतु, ग्रामसभेच्या मागणीनुसार कार्यकार अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प.कोल्हापूर यांनी दि.९ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये शासनस्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली सुधारित नेसरी नळ पाणी पुरवठा योजना रद्द करुन नवीन नळ पाणी पुरवठा योजनेस मान्यता देण्याची विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दुंडगे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ताम्रपर्णी नदीवरील बांधण्यात आलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा खचल्याबाबत.**

**(३) ३७७६ (२३-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दुंडगे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ताम्रपर्णी नदीवरील बांधण्यात आलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा खचल्यामुळे शासनाने लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यात क्षमते इतका पाणी साठा होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंधाऱ्याची दुरुस्ती करणे तसेच बंधाऱ्याची रुंदी वाढविण्याबाबत पत्राद्वारे माहे जुलै, २०१३ मध्ये वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची दुरुस्ती व रुंदी वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
सदर बंधारा खचला नसून बंधा-याच्या स्तंभांची थोडया फार प्रमाणात पडझड झालेली आहे. तरीही बंधा-यामध्ये पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यात येत आहे.
(२) होय.

(३) बंधा-याच्या आवश्यक दुरुस्त्या केल्या जात आहेत. मात्र बंधा-याच्या स्लॅबची रुंदी वाढविणे तांत्रिकदृष्टया अयोग्य असल्यामुळे रुंदीकरण करण्याचे नियोजन नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## गडहिंग्लज तालुकयातील (जि.कोल्हापूर) येथील नांगनुर येथील हिरण्याकेशी नदीच्या काठावरील रस्त्याची झालेली दुरावस्था

**(४) ३७७७ (२२-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील नांगनुर येथील हिरण्यकेशी नदीच्या काठावरील रस्ता पुराच्या पाण्याने खचत असल्याने सदरच्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी म्हणून या विभागातील लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती होण्याच्या दृष्टीने तसेच पुराच्या पाण्यापासून वारंवार रस्ता नादुरुस्त होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीनतेने हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथील कुदनुर-काकुंद्री ह्या रस्त्याची झालेली दुरावस्था

**(५) ३७७८ (२२-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील कुदनुर-काकुंद्री या रस्त्याचे मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०२-२०१५) :**(१) प्रश्नाधीन रस्ता प्रजिमा क्र. ६५ चा भाग असून एकूण १.७०० कि.मी लांबीचा आहे. त्यापैकी १.०० किमी लांबीचा रस्ता काळया मातीचा असल्यामुळे खराब झाला आहे.
(२) व (३) सदर रस्तावरील दुरुस्तीचे काम अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अग्रक्रमाने हाती घेवून रस्ता सुस्थितीत ठेवणेत येत आहे.

सदर लांबीतील मजबुतीकरणासह डांबरीकरणाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**ता. चंदगड (जि. कोल्हापूर) कलानंदी या गडाचा पर्यटन विकास कार्यक्रमामार्फत विकास करणेबाबत**

**(६) ३७७९ (२३-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता. चंदगड (जि. कोल्हापूर) कलानंदी या गडाचा पर्यटन विकास कार्यक्रमातून विकास करणेबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींनी दि. २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कलानंदी गडाच्या पर्यटन स्थळाचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दि. ७ मे, २०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो राज्य पर्यटन समिती समारे ठेवण्यात येईल व समितीच्या निर्णयानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**सामानगड, ता. गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) या पर्यटन स्थळाचा विकास होण्याबाबत.**

**(७) ३७८० (२३-१२-२०१४). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामानगड (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या पर्यटन स्थळाचा विकास व्हावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २१ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामानगड या ऐतिहासिक “क” वर्ग पर्यटन स्थळाचा विकास होण्याच्या दृष्टीने

शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी शासनास सादर केलेला प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समिती समोर विचारार्थ ठेवण्यात आला होता, राज्य पर्यटन विकास समिती निधीच्या उपलब्धतेनुसार निधी मंजूरीचा निर्णय घेते. वरील प्रस्तावास राज्य पर्यटन समितीने मान्यता दिलेली नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील साखळाई उपसा जलसिंचन योजनेच्या कामाची सद्य:स्थिती**

**(८) ३८२३ (२३-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील साखळाई उपसा जलसिंचन योजना शासनाने प्रस्तावित केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावित योजना ही कोणत्या कारणाने प्रलंबित आहे,
(३) असल्यास, सदर योजनेतील विसापूर धरणाची साठवण्याची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न करित आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील मुख्य धरणांतर्गत उंची वाढवण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(९) ३८२४ (१५-०१-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरणांतर्गत उंची वाढवण्याचा प्रस्ताव (CWC) नागपूर येथे शासनाच्या जलसंपदा विभागाने सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, मुळा धरणाला नद्या जोड प्रकल्पांतर्गत कोकणातील (कॅलमेट) पाणी मिळू शकते काय,
(४) असल्यास, सरासरी किती पाण्याचा साठा मिळू शकतो ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**(१०) ३८२५ (२३-१२-२०१४) श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामार्फत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदर जिल्ह्यातील रोजगार व स्वंयरोजगार केंद्रामार्फत किती बेरोजगारांना नोंदणी झालेली आहे,

(३) असल्यास, त्यापैकी किती बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(४) असल्यास, जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासन कोणती पावले उचलणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :**(१) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत राज्यातील नोंदणी केलेल्या नोकरी इच्छुकांना रोजगार व स्वयंरोजगाराकरिता सहाय्य व मार्गदर्शन करण्यात येते.

(२) अहमदनगर जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या नोंदणीपटावर सन २०१४ मध्ये डिसेंबर, २०१४ अखेर १३१२३६ उमेदवार आहेत.

(३) अहमदनगर जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत सन २०१० ते २०१४ मध्ये ८३९६ उमेदवारांना नोक-या प्राप्त झालेल्या आहेत.

(४) नोंदणीपटावरील बेरोजगारांसाठी शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत खालील योजना राबविण्यात येत आहेत.

अ) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम.

ब) रोजगार मेळावे

क) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना आर्थिक अनुदान

ड) स्वयंरोजगारांसाठी बीज भांडवल कर्ज योजना

---

**अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा कार्यालयांमार्फत धान्य वाटप प्रक्रियेत होत असलेली अनियमितता**

**(११) ३८२६ (२३-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा पुरवठा कार्यालयांनी वर्षभरात किती धान्य दुकानासाठी जाहिरनामे काढले आहेत,

(२) असल्यास, सदर जाहिरनामा काढल्यानंतर परिपत्रक काढून नियमाप्रमाणे किती वाटप करण्यात आले,

(३) नसल्यास, सदर प्रकरणी दोषी असणा-या अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१५) :** (१) अहमदनगर जिल्हयात जिल्हा पुरवठा कार्यालयाने माहे ऑगस्ट, २०१३ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत २१३ स्वस्त धान्य दुकानांसाठी जाहिरनामे प्रसिध्द केले.
(२) या जाहिरनाम्यानुसार प्राप्त झालेल्या ११९ अर्जांमधून नियमानुसार ७५ स्वस्त धान्य दुकानांना मंजूरी देण्यात आली.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील भुईकोट किल्याच्या विकासाबाबत**

**(१२) ३८३२ (२३-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील भुईकोट किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग तसेच अहमदनगर जिल्हाधिकारी यांनी पर्यटक व ऐतिहासिक स्थळ म्हणून विकास करण्याकरिता हाती घेतले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हाती घेतलेले काम अद्याप रखडण्याची कारणे काय आहेत ,
(३) असल्यास, सदर किल्ल्याच्या विकासासाठी अद्यापपर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(४) असल्यास, सदर किल्यांचे रखडलेले काम केव्हा पूर्णत्वास येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१५) :**(१) होय.
(२) सदर किल्ला भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील असल्याने सदरील कामे करण्यास संरक्षण मंत्रालयाची परवानगी आवश्यक आहे.
(३) रु.७.२३ कोटी खर्च झालेला आहे.
(४) पुढील कामे करण्यास परवानगी मिळण्यासाठी संरक्षण मंत्रालयास सामंजस्य करार करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. संरक्षण मंत्रालयाची त्यास मान्यता मिळाल्यावर सदर कामे करता येतील.

---

**कुकडी पाटबंधारे विभागातील सिंचनाअंतर्गत असलेल्या अहमदनगर, बीड व सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यात निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई**

**(१३) ३८३५ (२३-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी पाटबंधारे विभागात सिंचनाखाली असलेले अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत-जामखेड व बीड जिल्ह्यातील आष्टी तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा ह्या तालुक्यात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात पाण्याच्या संदर्भात शासनाने कोणते नियोजन केले आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

महसुल विभाग शासन निर्णय दि. १९ ऑगस्ट, २०१४ नुसार राज्यातील १२३ तालुक्यामध्ये ५०% पेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे राज्यातील १२३ तालुक्यामध्ये टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सदर तालुक्यामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्याचा व बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) कुकडी प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत, जामखेड आणि सोलापुर जिल्ह्यांतील करमाळा हे तालुके अवर्षण प्रवण आहेत. कुकडी प्रकल्पाद्वारे रब्बी हंगामामध्ये सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच पाणी टंचाईच्या काळात जिल्हाधिकारी, अहमदनगर व सोलापुर यांच्या आदेशानुसार तालुक्यातील मागणीनुसार पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन पुरवठा करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका व कुकडी प्रकल्पात समाविष्ट नाही. जिल्हाधिकारी बीड यांनी दि. १५.१०.२०१४ रोजी प्रकल्पाच्या जलाशयात उपलब्ध असलेला संपूर्ण पाणीसाठा टंचाई कालावधीसाठी फक्त पिण्यासाठी आरक्षित केला आहे.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील मांजरा धरणाअंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांवर पाणी टंचाईची ओढावलेली समस्या**

**(१४) ३८३९ (२३-१२-२०१४). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा धरणाच्या उभारणीसाठी केज, अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केल्या असून या धोरणामुळे दोन्ही तालुके सिंचनाखाली येतील असे असताना देवळा, अकोला, वांगदरी, कारसा पोहरेगाव येथील बॅरेजसमधील पाणी लातूर जिल्ह्यासाठी सोडण्यात आल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तब्बल १.८३ द.ल.घ.मि. पाणी सोडल्यामुळे अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांवर पाणी टंचाईची समस्या ओढावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणात अंबाजोगाई तालुक्यासाठी व शहरासाठी शेती व पिण्याच्या पाण्यासाठी किती जलसाठा उपलब्ध आहे,
(४) असल्यास, सदर तालुक्यातील शेतकऱ्यांवर ओढावलेली पाण्याच्या समस्येबाबत शासन कोणती ठोस भूमिका घेणार वा घेण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) होय.
(२) दिनांक १५.१०.२०१४ रोजीचा मांजरा प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा निरंक असल्याने जिल्हाधिकारी लातूर यांचे दि. ४/१०/२०१४ च्या आदेशानुसार देवळा, अकोला (वांजरखेडा), वांगदरी, कारसा पोहरेगाव मधून लातूर शहरासाठी पिण्याकरीता पाणी सोडण्यात आले.
३) व ४) मांजरा धरणातून अंबाजोगाई शहर पाणी पुरवठा योजनेसाठी १३.३८ दलघमी पाणी साठा आरक्षीत आहे. तसेच अंबाजोगाई तालुक्यातील २८८६.८६ हेक्टर क्षेत्र मांजरा धरणाचे लाभक्षेत्रात समाविष्ट आहे. दि. १५/१०/२०१४ रोजी उपलब्ध असलेला सर्व (२३.४०३ दलघमी) पाणीसाठा मांजरा धरणावर अवलंबून असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठीच आरक्षित ठेवलेला आहे. धरणातील पाणी मृत साठयात असल्याने शेतीसाठी पाणीसाठा उपलब्ध नाही.

---

**नागपूर येथे उमरेड रोड वर मौजा हरपूर येथे स्पोर्टस कॉम्पलेक्स व स्टेडिअम असे क्रिडा संकुल बांधण्याबाबत.**

**(१५) ३८४४ (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे उमरेड रोड वर मौजा हरपूर येथे स्पोर्टस कॉम्पलेक्स व स्टेडिअम असे क्रिडा संकुल बांधण्याचा निर्णय कामगार कल्याण मंडळ व ना.सु.प्र ने घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रिडा संकुलाचे बांधकाम ५० टक्के पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, १० वर्षे लोटूनही उर्वरित बांधकाम पूण होवू शकले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कामाला विलंब होण्याचे कारण काय,
(५) असल्यास, पुढील बांधकाम पुर्ण करण्यास शासन कटीबध्द आहे काय,
(६) असल्यास, प्रकल्प पुर्ण करण्यासाठी किती कालावधी लागेल,
(७) असल्यास, प्रकल्पाचा खर्च कोण करणार ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) शासनाने चौकशीच्या कारणास्तव सन २००६ ते २००९ या कालावधीत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सर्व बांधकामांना स्थगिती दिली होती. तद्नंतर सदरहू प्रकल्प करारातील नमुद अटीतील विहीत वेळेनुसार पुर्ण न होऊ शकल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास यांनी प्रकल्प आहे त्या स्थितीत ताब्यात घेतला, त्यामुळे बांधकामास विलंब झाला.
(५), (६) व (७) सदरहू प्रकरणी शासन, नागपूर सुधार प्रन्यास व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडून एकत्रितरित्या निर्णय घेण्यात येईल.

---

**महाराष्ट्र राज्य सुशिक्षित बेरोजगार संस्थेच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१६) ३८४६ (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था जिल्हा फेडरेशन राज्यस्तरीय कृती समितीने त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १० लक्ष रुपयापर्यंतच्या विना निविदा कामे देण्याचा शासनाने मान्य केले होते काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासन आपल्या निर्णयावर अंमलबजावणी करणार आहे काय,
(४) असल्यास, ती कधी करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) या निवेदनाच्या अनुषंगाने विविध विभागांकडून माहिती मागविण्यात येत असून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नागपूर जिल्हा परिषदेचा सेस फंड अखर्चित राहिल्याबाबत**

**(१७) ३८५३ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेने सन २०१3-२०१४ या वर्षात सेस फंडात २५ कोटी रूपयांची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा २५ कोटींचा निधी पूर्णत: खर्च करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी शिल्लक राहण्याची कारणे कोणती,
(४) तसेच या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरूध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०१-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१३-१४ या वर्षातील रु. २५.७८ कोटीपैकी रु. १८.१४ कोटीचा निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात सेस फंडसाठी रु. २५.७८ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीपैकी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रु. १८.१४ कोटीचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या निविदा प्रक्रिया विहित वेळेत पुर्ण न झाल्याने मार्च, २०१४ अखेर संपुर्ण निधी खर्च झाला नाही. ज्या बाबीचा शिल्लक निधी होता त्याच बाबीसाठी सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन खर्च करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्याबाबत

**(१८) ३८८६ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक १७ जानेवारी, २०१४ रोजी रीट पिटीशन क्र.७९५१/२०११ व रिट पिटीशन क्र.४८०२/२०१० च्या अनुषंगाने निर्णय देतांना समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करण्याचे निर्देश दिले असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिनांक १ जून, २०१४ पासून दरमहा निवृत्ती वेतन प्रत्यक्ष अदा करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुद्धा रिट पिटीशन क्र.६८२/२०१२ व रिट पिटीशन क्र.३२७७/२०१२ संदर्भात दाखल केलेल्या याचिकांबाबत निर्णय देताना समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करावयाचे आदेश दिले आहेत, तसेच दिनांक १२ जुलै, २०१० या निवृत्ती वेतन नाकारण्याचा शासनाचा निर्णय रद्दबादल ठरविला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १० जून, २०१३ रोजी रिट पिटीशन क्र.५७७१/२०११ ६८२/२०१२ व ३२७७/२०१२ च्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयाला राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात स्पेशल रिट पिटीशनद्वारा आव्हान दिले होते, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १० जानेवारी, २०१४ ला राज्य शासनाची याचिका फेटाळली आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने शासन निर्णय प्रसिद्ध का केला नाही ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०२-२०१५) :**(१), (२) व (३) होय. राज्यातील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील दिनांक १.११.२००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना दिनांक २९.१०.२०१४ च्या शासन निर्णयान्वये

दिनांक २.९.१९९९ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१४१०२९१२५८०५८९२२ असा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथील शासकीय विश्रामगृहाची इमारत नादुरुस्त झाल्याबाबत**

**(१९) ३८९० (२२-१२-२०१४). श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील शासकीय विश्रामगृहाची इमारत नादुरुस्त झाली असून त्याठिकाणी सोयीसुविधा मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) या विश्रामगृहात लोकप्रतिनिधी थांबत असून तेथे सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे लोकप्रतिनिधींची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार याठिकाणी भरपूर जागा उपलब्ध असल्यामुळे नवीन विश्रामगृह बांधण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरी आगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे मत्स्यविभागामार्फत मच्छिमारांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२०) ३८९१ (२७-०१-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरी आगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे मत्स्यविभागामार्फत मच्छिमारांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी जेटी उभारणेबाबत मंजूरी मिळाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जेटीचे निविदा प्रक्रिया होवून मक्तेदारांनी या ठिकाणी प्रत्यक्ष कामास दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, कामास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.

(३) सदरच्या कामाच्याबाबींमधील जोडरस्त्यासाठी संरक्षक भिंत बांधणेचे काम पूर्ण झाले आहे व नव्याने प्रस्तावित केलेल्या जेट्टीच्या जागेचे चाचणी छिद्रे (Trial Bore) घेण्यात आलेले असून त्यांची नमुना तपासणीसाठी पाठविणेत आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळझोंडी (ता.जि.रत्नागिरी) गावातील रास्त धान्य दुकानातील विक्रीस असलेल्या गव्हाच्या पोत्यात युरिया खताचे दाणे निदर्शनास आल्याबाबत**

**(२१) ३८९२ (१५-०१-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी तालुक्यातील कळझोंडी या गावातील रास्त दराच्या धान्य दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या गव्हाच्या पोत्यात युरीया खताचे दाणे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०२-२०१५) :** (१) होय,
(२) व (३) दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी रास्तभाव दुकान कळझोंडी ता.रत्नागिरी यांची पुरवठा निरीक्षक अधिकारी, रत्नागिरी यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीअंती सदर रास्त भाव दुकानातून विक्री करीत असताना काही पोत्यात युरिया मिश्रीत गहू व मातीमिश्रीत तांदूळ आढळून आले असता, त्या पोत्यांची विक्री थांबविण्यात आली असून, चांगले व स्वच्छ धान्य पाठविण्याबाबत तसेच खराब पोती बदलून देणेबाबत भारतीय अन्न महामंडळ, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे. यामध्ये रास्तभाव दुकानदार किंवा इतर कर्मचारी दोषी आढळून आले नसल्याने, त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील लिंबोटी प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांना जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत.**

**(२२) ३८९७ (२३-१२-२०१४). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील लिंबोटी प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून टाळाटाळ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा न्यायालयाने शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देणेबाबत आदेश देवूनही पाटबंधारे विभागामार्फत सदर प्रकरणे वरील न्यायालयात नेण्यात येतात व शेतकऱ्यांचे पैसे हातात येण्यासाठी वर्षानुवर्षे वाट पहावी लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) जिल्हा न्यायालयाने शेतक-यांना वाढीव मोबदला देणेबाबत, आदेश दिल्यावर २४४ प्रकरणात रु. ५०७.५६ लक्ष वाढीव मोबदला अदा करण्यात आलेला आहे व उर्वरित १५८ प्रकरणात मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अपील केले आहे.

---

**पवनी (जि. भंडारा) तालुक्यातील उमरेड कऱ्हांडला वन्यजीव प्रकल्पाला लागून असलेल्या गावांत वाघांचा धुमाकूळ सुरु असल्याबाबत**

**(२३) ३९०१ (२२-१२-२०१४). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि. भंडारा) तालुक्यातील पवनीला लागून असलेल्या उमरेड कऱ्हांडला वन्यजीव प्रकल्पाला लागून असलेल्या व प्रकल्पात जंगलाने वेढलेल्या गावांत वाघांचा धुमाकूळ सुरु असूनही प्रकल्प व्याप्त गावांच्या पुनर्वसनसंबंधी कोणतेही ठोस पाऊल न उचलल्यामुळे ह्या परिसरातील लोक भितीयुक्त वातावरणात शेतीची कामे करुन गावातही रात्री जागरणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी वन्यजीव प्रकल्पामार्फत स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव सदर वन्यजीव प्रकल्प कार्यालयामार्फत संबंधीत विभागाकडे कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१५) :** (१) व (२) पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात एकाही गावाचा समावेश नाही.

पाऊणगाव, कसडसी व गायडोंगरी या गावाचे ग्राम पंचायतीनी पुनर्वसन करण्याबाबत ठराव पारीत केला आहे. सदर गावांचा अभयारण्य क्षेत्रात समावेश नसल्याने पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अभयारण्य क्षेत्राला लागून असलेल्या जंगलात वाघाने धुमाकूळ घातला हे खरे नाही, तथापि दिनांक ०२.११.२०१४ रोजी खापरी (रहे) या गावात एक महिला, बिबट्याच्या हल्यात जखमी झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यातील विकास कार्यक्रमांतर्गत भुम परांडा रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२४) ३९११ (२३-१२-२०१४). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील विकास कार्यक्रमांतर्गत भुम परांडा रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी रुपये २२ कोटी मंजूर करण्यात आला होता. तथापि, अपूर्ण राहिलेल्या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकाची ३३.८५ कोटीचा निधी उभारणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २६ मे, २०१४ रोजी पाठवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०१-२०१५) :**(१) होय खरे आहे.

(२) उस्मानाबाद जिल्ह यातील भूम परांडा रस्त्याची सुधारणा करणे या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची प्रक्रीया प्रगती प्रथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूम आरसोळी देवकाळी (जि.उस्मानाबाद) या रस्त्याची व पुलाची दुरुस्तीबाबत**

**(२५) ३९१३ (२४-१२-२०१४). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम आरसोळी देवकाळी (जि.उस्मानाबाद) या रस्त्याची व पुलाची प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१३-२०१४ मध्ये एनआरआरडीएकडे मंजूरीसाठी पाठवून अद्याप मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत, तसेच सदर रस्ता व पुलाच्या कामास निधी देऊन कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) प्रधान मंत्री ग्राम सडक योजना - II अंतर्गत केंद्र शासनाने राज्यासाठी निश्चित केलेल्या रस्ते दर्जोन्नती उद्दिष्टांस अनुसरून शासनाने उस्मानाबाद जिल्ह्यासाठी नेमून दिलेल्या दर्जोन्नती लांबीचे उद्दिष्ट पुर्ण झालेले असल्यामुळे सदर रस्त्याचे काम हाती घेता आलेले नाही.

केंद्र शासनाकडून राज्याला भविष्यात रस्ते दर्जोन्नती लांबीचे उद्दिष्ट वाढवून मिळाल्यास या योजनेच्या मार्गदर्शक सुचना व विहित निकषांच्या अधिन राहून सदरहू कामाच्या समावेशाबाबत विचार करता येईल.

---

**यवतमाळ जिल्हयात वन विभागाने बंद केलेल्या पावती पद्धतीमुळे शेळी मेंढी व्यवसाय करणाऱ्या धनगर समाजावर आलेले संकट**

**(२६) ३९१८ (२२-१२-२०१४). प्रा. अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील धनगर समाजाच्या लोकांना शेळी मेंढी चराईसाठी वन विभागाकडून वन चराई क्षेत्राकरीता पूर्वी पावती देण्यात येत होती त्यामुळे ते आपल्या शेळया-मेंढया वनक्षेत्रात चारण्यास नेत होते परंतु आता पावती पध्दत बंद झाल्यामुळे शेळया मेंढया चारण्यासाठी त्यांना जागा नसल्याने शेळया मेंढया चारण्याचा प्रश्न उपस्थित झाल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजीचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने बंद केलेली पावती पध्दत आणि त्यामुळे शेळी मेंढी व्यवसाय करणाऱ्या धनगर समाजावर आलेले संकट याबाबत शासनाकडून काय निर्णय घेण्यात येतील,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१५) :**(१) व (२) शासन निर्णय दिनांक २१.०३.२००५ अन्वये चराई जमाबंदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर चराई जमाबंदी अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालास दिनांक ०६.०५.२००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर अहवालान्वये यवतमाळ जिल्हयात यवतमाळ व पांढरकवडा वन विभागत मेंढी चराईची तरतूद नाही. तथापि पुसद वन विभागात ४१२ हे.क्षेत्र मेंढी चराईसाठी उपलब्ध आहे.

शासन निर्णय दिनांक ०६.०५.२००८ अन्वये अंतर्गत अटी प्रमाणे मेंढी चराईसाठी पासेसची मागणी करण्यात आली नसल्याने पासेस जारी करण्यात आलेले नाही.

यवतमाळ व पांढरकवडा वन विभागत मेंढी चराईकरिता पासेस मिळणेबाबत माहे जुलै, २०१४ मध्ये मागणी केली होती. तथापि, मंजूर चराई जमाबंदी अहवालानुसार यवतमाळ व पांढरकवडा वन विभागात मेंढी चराईची तरतूद नसल्याने परवागनी देण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चिखलडोंगरे व मारंबळपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथे मासळी सुकविण्याचा चौथरा व उघडा निवारा बांधण्याबाबत**

**(२७) ३९४२ (२७-०१-२०१५). श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा खाडी किंवा किनाऱ्यावरील गाव मौजे चिखलडोंगरे व मारंबळपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथे मासळी सुकविण्याचा चौथरा व उघडा निवारा बांधून देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०११ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनानूसार काय कार्यवाही करण्यात आली आहे
(३) सदरहू काम हाती घेऊन तत्परतेने पूर्ण करण्याच्या दृटीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सन २०११-१२ च्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सदर कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

---

## नागभीड तालुक्यातील (जि.चंद्रपूर) घोडासरी सिंचन प्रकल्पाच्या नादुरूस्त नहर व वाहिन्यांचे अस्तरीकरण व मजबुतीकरण करण्याबाबत

**(२८) ३९४४ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ब्रिटीशकालीन निर्मित घोडाझरी सिंचन प्रकल्पाच्या नहर व नहरांच्या वाहिन्या नादुरूस्त असल्याने अस्तरीकरण व मजबुतीकरणाच्या कामांचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्वातंत्र्यपूर्व काळातील बांधकामावर दरवर्षी करोडो रूपयांचा निधी खर्च होऊनही सिंचन क्षेत्र वाढीऐवजी कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घोडाझरी तलावाच्या सिंचन प्रकल्पाच्या मुख्य नहर व वाहिन्यांच्या अस्तरीकरण व मजबुतीकरण करून सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या प्रस्तावावर शासन मंजुरी देऊन बांधकामे पूर्ण होण्यासाठी निश्चित किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) असल्यास, सदर कामास येणारा खर्च किती व कोणत्या निधीमधून कामे प्रस्तावित केलेली आहेत, त्याचा सर्वसाधारण तपशील काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०१-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
सिंचन क्षेत्र कमी झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसीखुर्द प्रकल्पाच्या (जि. भंडारा) सिंचन क्षेत्रात समावेश नसलेल्या परिसरात शिवनाला उपसा सिंचन प्रकल्पास मंजूर देणेबाबत**

**(२९) ३९४५ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पाच्या मुख्य नहराशेजारील नागभीड तालुक्यातील (जि.भंडारा) सिंचन क्षेत्रात समावेश नसलेल्या परिसरात शिवनाला उपसा सिंचन प्रकल्प प्रस्तावित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिवनाला उपसा सिंचन प्रकल्पास मंजुरीबाबत प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास मान्यतेसह बांधकामाकरीता काही उपाययोजना करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, सर्वसाधारण तपशील काय?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) नाही

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसीखुर्द प्रकल्प घटक मोखाबर्डी उपसा सिंचन योजना (ता.भिवापूर) चिमूर तालुक्यातील मुख्य कालव्याचे रखडलेल्या विकास कामांबाबत**

**(३०) ३९४७ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्प घटक-मोखाबर्डी उपसा सिंचन योजना (ता.भिवापूर) अंतर्गत चिमूर तालुक्यातील मुख्य कालव्याचे काम माहे नोव्हेंबर २०१४ पर्यंत अपूर्ण असल्याने सिंचन होऊ शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्याच्या बांधकामामध्ये शेतजमिनीच्या अधिग्रहणाचा प्रश्न प्रलंबित असल्याने बांधकामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे बांधकाम पूर्ण करुन सिंचन सुरु करण्यासाठी शासनाने निश्चित ठरविलेला कालावधी काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) योजनेच्या मुख्य कालव्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून वितरण प्रणालीची कामे प्रगतीपथावर आहेत. पंपगृह व रायझींग मेन व तत्संबंधी अपूर्णावस्थेतील कामे तसेच प्रकल्पाकरीता आवश्यक विजपुरवठा करीत वीज पारेषण वाहीणी तसेच Switch Yard चे

प्रलंबित असलेली कामे उर्वरित भुसंपादनासह २ वर्षात पूर्ण करुन योजना कार्यान्वित करणे असे नियोजन निधी उपलब्धतेच्या अटीचे अधीन राहून करण्यात आले आहे.

---

**जिल्हा परिषद अंतर्गत लघू सिंचाई उपविभाग चिमूरच्या मामा तलाव दुरुस्ती, खोलीकरण, मजबुतीकरण व बंधाऱ्याच्या प्रस्तावित विकास कामांबाबत**

**(३१) ३९४८ (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत लघू सिंचाई उपविभाग चिमूरच्या मामा तलाव दुरुस्ती, खोलीकरण, मजबुतीकरण व बंधाऱ्याच्या प्रस्तावित कामांस मंजूरी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित कामांत आदिवासी, गैरआदिवासी व व्हीआयआयडीपी लेखाशिर्षाअंतर्गत २१ कामे प्लग बंधारे, को.प.बंधारे, सिमेंट प्लब बंधारे, प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावित कामांत गैर आदिवासी, आदिवासी, ल.पा.तलाव दुरुस्ती बाबत प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावित कामांस मंजूरी प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर उपविभागांतर्गत लघु सिंचाईचे १५ सिमेंट बंधारे व २ कोल्हापुरी पध्दतीच्या बंधा-याची कामे तसेच ११ कोल्हापुरी बंधारे दुरुस्तीची कामे व २ माजी मालगुजारी तलाव दुरुस्तीची कामे असे एकूण ३० कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जिल्हा नियोजन, आदिवासी, गैर आदिवासी, देखभाल दुरुस्ती, जिल्हा परिषद सेस व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत वेगवेगळ्या लेखाशिर्षाखाली एकूण ३० कामे मंजूर आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) एकूण ३० कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली असून सदरची कामे मार्च, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न बहुमान बहाल करण्यासाठी राज्य शासनाचा केंद्र शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव.**

**(३२) ३९४९ (१५-०१-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर), श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न बहुमान बहाल करण्यासाठी राज्य शासनाने भारत सरकारकडे प्रस्ताव सन २०१४ मध्ये प्रस्तावित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर भारत सरकारकडून त्वरीत कार्यवाही होण्यासाठी पुन:श्च पत्रव्यवहार राज्य शासन करणार आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१५) :**(१) नाही.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करणे बाबतचा प्रस्ताव तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचे दिनांक ८ /६/२००६ च्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

(२) व (३) बाबत

सदर प्रस्तावावर कार्यवाही होण्यासाठी राज्यामधील आमदारांचे एक शिष्टमंडळ मा.पंतप्रधानाना भेटणार आहे. त्यासाठी मा.पंतप्रधानांची वेळ घेण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ८/१०/२०१२ व दिनांक ३०/७/२०१४ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे.

---

**नागपूर-नागभीड नॅरोगेज रेल्वेचे दर्जोन्नत करुन ब्रॉडगेज रेल्वेबाबत राज्य शासनाचा केंद्र सरकारकडे पाठविण्यात आलेला प्रस्ताव**

**(३३) ३९५० (२३-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-नागभीड नॅरोगेज रेल्वेचे दर्जोन्नत करुन ब्रॉडगेज रेल्वे करण्याबाबत राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाकरीता राज्य शासनाचा आर्थिक वाट्याअंतर्गत येणाऱ्या निधीचा भरणा राज्य शासनाने केलेला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर मंजूरीबाबत निश्चित उपाययोजना व पूर्ण होण्याकरीता किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) नागपूर-नागभिड या १०६.१५ कि.मी. अंतराच्या रेल्वेमार्गाचे नॅरोगेजचे रुपांतर ब्रॉड-गेज मध्ये करण्यासाठी होणारा अंदाजित खर्च रु. ३७६.२१ कोटीपैकी राज्य शासनाने ५०% सहभागाची रक्कम रु. १८८.११ कोटी इतकी केंद्र शासनास निधीच्या उपलब्धतेनुसार

टप्प्याटप्याने उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. सदर प्रकल्पाचा सुधारित अंदाजित खर्च रु. ४०१ कोटी इतका असून, खर्चास रेल्वे मंत्रालयाची मान्यता अप्राप्त आहे. मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे विस्तृत अंदाजपत्रक छाननी करुन, शासनाच्या हिश्शाचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर विधानसभा क्षेत्रातील खनिज विकास निधी अंतर्गत प्रस्तावित विकास कामांबाबत**

**(३४) ३९५१ (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उपसचिव, खनिकर्म विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर विधानसभा क्षेत्रातील व चंद्रपूर जिल्ह्यातील विकास कामे मंजूरीकरिता प्रस्तावित करण्यासाठी मा.जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पत्रव्यवहार दिनांक ११/०८/२०१४ रोजी वा त्यासुमारास केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामे प्रशासकीय मान्यतेसह खनिकर्म महामंडळ, नागपूरद्वारा राज्य सरकारकडे मंजूरीकरीता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तात्काळ करावयाच्या विकास कामांना मंजूरीकरीता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकास कामांना त्वरीत मान्यतेकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१०-०३-२०१५) :**(१) होय.

(२), (३) व (४) सदर कामांची प्राकलने कार्यान्वयन यंत्रणांकडून प्राप्त करुन घेऊन सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून दिनांक २२.०८.२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि, अद्यरप सदर कामांची प्राकलने महामंडळाकडे प्राप्त झालेली नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील पारस औष्णिक केंद्र प्रकल्पाअंतर्गत बाधीत प्रगत व कुशल प्रशिक्षणार्थ्यांना कायम सेवेत सामावून घेणेबाबत**

**(३५) ३९५९ (१५-०१-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील पारस औष्णिक केंद्र या प्रकल्पाचे प्रकल्प बाधीत परंतू प्रगत व कुशल प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण पूर्ण करुन तसेच ५० टक्के विशेष आरक्षण देऊन सुध्दा अद्याप सेवेत सामावून घेतले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प बाधीत कुशल प्रगत प्रशिक्षणार्थी तुटपुंज्या विद्या वेतनावरच सुरळीत ठेवून मात्र तत्सम कामावर बाहेरील कंत्राटी कामगारांना नेमण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रगत कुशल प्रशिक्षणार्थींना सेवेत सामावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, सदर प्रगत कुशल प्रशिक्षणार्थींना सेवेत सामावून घेण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :** (१) नाही.

महानिर्मिती कंपनीची महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पांमुळे भुमिहीन झालेल्या प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेण्यासाठी सदैव आग्रही भुमिका राहिलेली आहे. महानिर्मिती कंपनीतर्फे देण्यात येणारे १ वर्ष कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण विहित मुदतीत पूर्ण केलेल्या आयटीआय उत्तीर्ण महानिर्मिती प्रकल्पग्रस्त उमेदवारांना तंत्रज्ञ ३ या पदावर सामावून घेण्याकरिता सरळसेवा जाहिरातीमध्ये एकुण रिक्त पदांच्या ५० टक्के पदे आरक्षित ठेवण्यात येवून त्यांना प्राधान्य क्रमाने कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यात येते. तथापि अद्यापपर्यंत महानिर्मिती कंपनीतर्फे पारस औष्णिक विद्युत केंद्रामुळे भुमिहीन झालेल्या एकूण २२ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यात आले असून ७३ उमेदवार महानिर्मिती कंपनीतर्फे देण्यात येणारे प्रगत कुशल प्रशिक्षण घेत आहेत.
(२) नाही.
(३) सद्यस्थितीत महानिर्मिती कंपनीतर्फे तंत्रज्ञ ३ या पदाची सरळसेवा जाहिरात क्र. ०४ (ऑगस्ट/२०१४) प्रसिध्द करण्यात आली असून यामध्ये महानिर्मिती प्रगत कुशल प्रशिक्षणार्थींकरिता आरक्षीत ठेवण्यात आलेल्या ५० टक्के रिक्त पदांस अनुसरुन एकूण १५४ पदे सदर उमेदवारांमधून भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा तालुक्यात (जि. सोलापूर) कुकडी डावा कालवा अंतर्गत पोंधवडी चारीचे अपूर्ण कामाबाबत

**(३६) ३९७२ (२३-१२-२०१४). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि. सोलापूर) कुकडी डावा कालव्यातील पोंधवडी चारीचे (किमी ४/१०७ ते ७/३००) बोगदा व खोलीकरण काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२)तसेच कुकडी कालवा अस्तरीकरण्याचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे पाण्याचा प्रवाहावर

परिणाम होऊन शेतक-यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.
(२) हे अंशतः आहे.
(३) सुधारित प्रशासकीय मान्यता अभावी प्रकल्पावर खर्च करता येत नसल्याने प्रकल्पाची कामे बंद आहेत. कुकडी प्रकल्पाचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनाने विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील वीज महावितरण विभागातील कर्मचा-यांची रिक्त असलेलील पदे**

**(३७) ३९७४ (२३-१२-२०१४). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील वीज महावितरण विभागाकडील एकूण कर्मचारी व अधिकारी यांची मंजूर पदांच्या संख्येपैकी काही पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :**(१) होय.
(२) अभियंता संवर्गातील पदे भरण्याकरीता जाहिरात क्र. ०४/२०१४ दि. १६.०७.२०१४ व जाहिरात क्र. ०६/२०१४ दि. १६.१२.२०१४ नुसार भरती प्रक्रिया सुरु आहे. तांत्रिक कर्मचा-यांपैकी वर्ग -४ ची प्रारंभिक पदे भरतीबाबत जाहिरात क्र. ०५/२०१४ दि. २९.०८.२०१४ नुसार भरती प्रक्रिया सुरु आहे. इतर वर्ग - ३ व वर्ग-४ च्या तांत्रिक कर्मचा-यांची पदे पदोन्नतीद्वारे भरण्याबाबत सोलापुर मंडल कार्यालयास आदेशित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील ८३ वरिष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यकांच्या नियुक्त्या रद्द केल्याबाबत**

**(३८) ३९८४ (२२-१२-२०१४). श्री. मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील ८३ वरिष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यकांच्या नियुक्त्या दि. १० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास रद्द केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृती समिती वरिष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यक यांनी सेवेमध्ये पूर्णबाहल करण्याबाबत विनंती अर्ज सादर केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) डॉ.पंजाबराब देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना वरिष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रिया लवकर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून वरिष्ठ व संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रियाबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर प्राधान्याने करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेतील अर्धवेळ सफाई कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार वेतन अनुज्ञेय करण्याबाबत.**

**(३९) ३९८५ (२२-१२-२०१४). श्री. मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषदेतील अर्धवेळ सफाई कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार वेतन अनुज्ञेय मिळण्याबाबत शासनाने मागितलेल्या माहिती नुसार मा.मु.का.अ.जि.प. यवतमाळ यांनी दि. २७ ऑगस्ट, २०१२ रोजी मा. आयुक्त, अमरावती विभाग यांच्या मार्फत शासनास प्रस्ताव सादर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली काय व तदूनुसार कोणती कारवाई केली वा करीत आहे आणि त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१) होय.
(२) याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ वन वृत्तातच स्थानिक जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधीतून कोटयावधी रुपयांची जल व मृद संधारणाची कामे राखीव वनात करण्यात आल्याबाबत.**

**(४०) ३९९३ (२२-१२-२०१४). श्री. मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ, वाशिम, अकोला या तीन जिल्ह्यांमध्ये यवतमाळ वनवृत्त व्यापले असून तीन जिल्ह्यांमध्ये हे वृत्तपत्र असल्याने तीनही ठिकाणच्या जिल्हा विकास व नियोजन समितीच्या निधीतून यवतमाळ या एकाच वनवृत्तात कोटयावधी रुपयांची जल व मृदा संधारणाची कामे वन विभागाने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा विकास व नियोजन समितीच्या निधीतून यवतमाळ वनवृत्तात वास्तविक ही कामे वन परीक्षेत्र अधिका-यांनी कुशल आणि अकुशल मजुर वापरुन आवश्यक त्या ठिकाणी मशीनद्वारे करायची असताना नियम धाब्यावर बसवून ३० टक्के वाटा ठेवून वन विभागाने ही कामे राजकीय कार्यकर्ते, पदाधिकारी, कत्रांटदार यांना देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३० टक्के वाटा ठेवून या कामांचा दर्जा काय राहील, कोटयावधीचे पानवठे, वनतळे माती नाला बांध व अन्य विकास कामे ही कागदोपत्रीच झाली, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, वनविभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मधील डान्सबार पुर्णपणे बंद झाले नसल्याबाबत**

**(४१) ३९९४ (१५-०२-२०१५). श्री. सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील एल.बी.एस.मार्ग भांडूप (प) साखी हॉटेलमध्ये सर्रासपणे डान्स बार रात्री उशीरापर्यंत चालतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डान्सबार विरोधी कायदा आला असूनही मुंबई मध्ये डान्सबार अजूनपर्यंत पुर्ण पणे बंद झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) परवान्यातील वेळेप्रमाणे बार रात्रौ ०१.३० वाजेपर्यंत चालू असतात. मुंबईतील काही

ऑकेस्ट्रा बारमध्ये ऑकेस्ट्राच्या नावाखली बारबाला नृत्य करतांना आढळून आल्याने त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३ (ए) नुसार कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१४ एकूण २७ गुन्हे दाखल केले असून २१४ आरोपींना अटक करण्यात आलेली. तसेच, दिनांक २८/०२/२०१५ पर्यंत ११ गुन्हे दाखल केले असून १४३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हरीओम नगर (मुलुंड) येथील नागरीकांना वाहनांना टोल माफ करण्याबाबत**

**(४२) ३९९७ (२२-१२-२०१४). श्री. सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सिमा अधिकार नुसार मुंबईतील स्थानिकांना टोल टॅक्स लागत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलुंड हायवे आणि हरीओम नगर (मुलुंड) च्या मधोमध टोल नाका असून हरिओम नगर, मुलुंड येथील नागरिकांकडून वाहनांना टोल कर वसुल केला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील स्थानिक रहिवाश्यांना २५ टक्के टोल माफीच्या पासेस देऊन पुढे पुर्ण माप केल्याचे सांगितले जात असूनही अद्यापपर्यंत टोल टॅक्स माफ करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, येथील नागरिकांना तात्काळ टोल कर माफ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) मुंबई सीमा अधिकारानुसार मुंबईतील स्थानिकांना कोणतीही टोलमाफी नसल्यामुळे हरिओम नगर, मुलुंड (पूर्व) येथील नागरिकांकडून टोल वसूल केला जातो.
(३) नाही.

मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या बैठकीत दिनांक १ डिसेंबर, २०१३ पासून हरिओम नगर, मुलुंड (पूर्व), मुंबई येथील रहिवाशांना त्यांनी आवश्यक कागदपत्रे पुरावा म्हणून दाखल केल्यानंतर पथकर अधिसूचनेप्रमाणेच्या मुलुंड (पूर्व) येथील टोलनाक्याकरिता सध्याच्या मासिक पासचा दर कमी करून तो फक्त त्या दराच्या २५ टक्के इतक्या सवलतीच्या दराने आकारण्याबाबत उद्योजकाकडून E.T.C/R.F.I.D. देण्यात येईल. असा निर्णय झाला. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. संपूर्ण टोल माफ करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**रामटेक (जि. नागपूर) येथील तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्र असून विकासाची अनेक कामे रखडल्याबाबत**

**(४३) ४००४ (२३-१२-२०१४). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि. नागपूर) येथील तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी नियुक्त विकास समितीमध्ये विभागीय आयुक्त, सचिव, जिल्हाधिकारी असून मागील सहा महिन्यापासून कोणतीही बैठक घेण्यात आलेली नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीर्थक्षेत्राचा विशेष प्रोजेक्ट रिपोर्ट (डी.पी.आर) तयार झाला असून मागील आर्थिक वर्षामध्ये तत्कालीन मा. वित्त मंत्र्यांनी रुपये २०० कोटीचा निधी मंजूर केलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत निश्चित किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०२-२०१५) :**

(१) व (२) हे खरे नाही. नियोजन विभागात रामटेक (जि.नागपूर) विकास आराखडा ही योजना विचाराधीन आहे. तथापि, जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून विभागीय आयुक्तांमार्फत सदर योजनेचा आराखडा शासनास प्राप्त झालेला नाही. याबाबत प्राथमिक कार्यवाही विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडून करण्यात येत आहे.

सन २०१४-१५ करिता रु. ५.०० कोटीचा नियतव्यय ठेवण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक, जि.नागपूर सत्रापूर उपसा सिंचन योजना कालव्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४४) ४००६ (२३-१२-२०१४). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) सत्रापूर उपसा सिंचन योजना कालव्याचे काम पूर्ण झालेले नसून डावा-उजवा कालवा सुध्दा अपूर्ण स्थितीत असल्यामुळे तसेच सिंचन विभागाने विजेच्या देयकाचा भरणा न केल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होऊन धान उत्पादक शेतकऱ्यांना खरीप पीकासाठी पाणी मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :**

(१) उजव्या कालव्याचे व त्यावरील लघु कालव्याचे कामे पूर्णत्वावर असून डाव्या कालव्याची कामे प्रगती पथावर आहेत या योजनेची एकूण सिंचन क्षमता ३९३० हे. पैकी जुन २०१४ पर्यंत १८९५ हे. सिंचन क्षमता निर्माण झालेले आहे. या प्रकल्पाद्वारे सरासरी ४०० हे. प्रत्यक्ष सिंचन झालेले आहे. ऑक्टोबर २०१४ नंतर शेतक-यांची खरीप हंगामासाठी पाणी मागणी नव्हती.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील उद्योग उभारणीसाठी विविध प्रकारच्या मंजु-या घ्याव्या लागत असल्याबाबत**

**(४५) ४०१८ (२२-१२-२०१४). श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील उद्योग उभारणीसाठी विविध प्रकारच्या ७६ मंजुऱ्या घ्यावा लागत असल्याने या पक्रियेत खूप वेळ वाया जातो, हे टाळण्यासाठी लागणाऱ्या मंजुऱ्यांची संख्या किमान करुन त्या आठवड्याभरात मिळतील, अशी गतिमान व्यवस्था तयार केली जाईल, अशी घोषणा मा.उद्योगमंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ दरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी नवीन गतिमान व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०१-२०१५) :** (१) "मेक इन महाराष्ट्र" संदर्भात दिनांक १७/०९/२०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये उद्योग/व्यवसायांना लागणा-या विविध ६७ नाहरकती/मंजु-यांची प्रकिया सुलभ व जलद करण्यासाठी अशा प्रक्रिया कमीत कमी करुन तसेच त्यासाठी लागणारा सध्याचा कालावधी किमान करण्याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२) व (३) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध/ संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक करणा-या उद्योगांना लागणा-या विविध /संमती जलद गतीने (Fast Track Approvals) उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक-मेइम/२०१४- प्र.क्र./८८ उद्योग८- दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच प्रधान सचिव (उद्योग) सातत्याने विविध प्रशासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेवून सदर प्रकरणी शासनस्तरावरुन करावयाच्या कार्यवाहीबाबत ठोस निर्णय घेण्यासाठी सर्वकष प्रस्ताव सादर करण्यासाठी पाठपुरावा करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडा कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी लाभार्थ्यांला भुखंडाचा ताबा न दिल्याबाबत**

**(४६) ४०६६ (२३-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी यांना गेल्या तीस वर्षापासून लाभार्थ्यांला भुखंडाचा ताबा न दिल्याप्रकरणी म्हाडा कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी यांना राज्य ग्राहक आयोगाने ताकीद दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कारवाई न करण्याचे कारण काय ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०३-२०१५) :** (१), (२), (३) व (४) मुख्य अधिकारी, कोकण मंडळ यांचे वतीने संबंधित मिळकत व्यवस्थापक, कोकण मंडळ राज्य ग्राहक आयोगापुढे सुनावणीस हजर झाले असता, मुख्य अधिकारी, कोकण मंडळ यांनीच राज्य ग्राहक आयोगापुढे सुनावणीस हजर रहावे, असे आयुक्त यांनी निर्देश दिले होते व पुढील सुनावणीच्या वेळी मुख्य अधिकारी सुनावणीस हजर राहिले होते.

---

**राज्यातील एस.टी.करिता टोलमाफी निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करणेबाबत**

**(४७) ४११८ (१५-०१-२०१५). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी.ला टोलमाफी देण्याचा निर्णय घेण्यात येऊनही अद्यापी त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यामुळे एस.टी.ला आजही टोल भरावा लागत असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.टी. ला टोल माफ करण्याबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०३-२०१५) :** (१) व (२) शासनामार्फत दि.०१.०७.२०१४ पासून एकूण ४४ पथकर नाके बंद करण्यात आले आहेत. तसेच दि.०१.०१.२०१५ पासून मुंबई-पनवेल मार्गावर खारघर येथे नव्याने सुरु झालेल्या पथकर नाक्यावरुन रा.प. महामंडळाच्या बसेसना दि.०३.०१.२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील उप्रकरप्राप्त इमारतीतील अतिधोकादायक इमारत शोधण्याकरिता म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ बाहेरुनच सर्वेक्षण करण्यात येत असल्याबाबत

**(४८) ४१२७ (२३-१२-२०१४). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उप्रकरप्राप्त इमारतीतील अतिधोकादायक इमारत शोधण्याकरिता म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ बाहेरुनच सर्वेक्षण करण्यात येऊन अतिधोकादायक इमारती जाहीर करण्यात येत असल्यामुळे इमारतीच्या आतील हानी व आपद्‌ग्रस्त भाग शोधला जात नसल्यामुळे इमारतीचा काही भाग कोसळून वारंवार लहान-मोठे अपघात होऊन जीवीत व वित्त हानी होत असल्याचे धक्कादायक प्रकार माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार इमारतीचे बाहेरुन व आतूनही सर्वेक्षण करण्यात येऊनच इमारती धोकादायक ठरविण्यात याव्यात याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०३-२०१५) :** (१) मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीतील अतिधोकादायक इमारत शोधण्याकरिता म्हाडाच्या अधिका-यांकडून केवळ बाहेरुन सर्वेक्षण करण्यात येते हे खरे नाही.

तथापि, सदर इमारती या दाटीवाटीने असल्याने दोन इमारतींमधील अरुंद गल्लीबोळ, त्यात साचलेला घनकचरा, घाणीने तुंबलेली गटारे यामुळे इमारतींच्या संपुर्ण बाह्यभागाचे तसेच काही खोल्यामध्ये आतून सजावटीकरीता फॉल्स सिलिंगचे काम केल्याने, काही खोल्या बंद असल्याने तर काही भाडेकरुंचा सर्व्हेक्षणास असलेला विरोध या कारणांमुळे काही इमारती नियमितपर्यंचे सर्वेक्षण करण्यात येऊन इमारतीच्यासंपुर्ण आंतर्भागाचे परिक्षण करता येत नाही, हे खरे आहे. मंडळाच्या अभियंत्यांमार्फत इमारतींच्या दुरुस्ती संदर्भातील आवश्यक कार्यवाही करण्यात येते.
(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथे महापालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन (बीएमयूपी) योजनेचे काम अद्यापी पूर्ण न झाल्याबाबत.**

**(४९) ४१३४ (२३-१२-२०१४). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथे केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्रत्थान अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन (बीएमयूपी) योजना सुरु होऊन तब्बल चार वर्षे होऊनही योजनेचे काम अद्यापी पूर्ण करण्यात आले नसल्यामुळे लाभार्थ्यांना अद्याप घरे मिळाली नसल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लाभार्थ्यांना घरे देण्याबाबत तसेच या कामास दिरंगाई व टाळाटाळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश मेहता (०७-०३-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे. कलयाण डोंबिवली महानगरपालिकेतंर्गत १३४६९ घरकुलांचा समावेश असलेले ४ प्रकल्प मंजूर होते. त्यातील एक प्रकल्प रद्द होऊन दोन प्रकल्प सिमित झाल्याने अंतिमतः ८१८८ घरकुलांच्या तीन प्रकल्पांचे काम सुरु आहे. ४८९ घरकुले पूर्ण होऊन लाभार्थ्यांना वाटप झालेली आहेत. सन डिसेंबर, २०१५ अखेर पर्यंत मंजूर घरकुले पूर्ण होणे अपेक्षित आहे.

झोपडपट्टीवासियांचा विरोध, जागेची उपलब्धता न्यायलयीन दावे. रेतीचा तुटवडा इ. कारणामुळे प्रकल्पाची अंमलबजावणीत विलंब झाला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील म्हाडा या मुख्य कार्यालयात मुख्य दक्षता अधिकारी पदाची रिक्त जागा भरण्यात आली नसल्याबाबत**

**(५०) ४१३५ (२३-१२-२०१४). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा च्या मुख्य कार्यालयात लाचलुचपत प्रकरणे मोठया प्रमाणात निदर्शनास येत असताना मुख्य दक्षता अधिकारी पदाची रिक्त जागा मागील काही महिन्यापासून भरण्यात आलेली नसल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य दक्षता अधिकारी यांची रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०३-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर पद भरण्याबाबत गृह विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे** |
| **मुंबई.** | **प्रधान सचिव,** |
| | **महाराष्ट्र विधानसभा.** |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.